# परिशिष्ट २

## प्रश्नावली

नांव

पत्ता

विवाहित / अविवाहित विधुर/ घटस्फोटित

१) जन्मतारीख

२) धर्म /जात/ प्रवर्ग

३) शिक्षण

४) व्यवसाय

५) राजकारणातील अनुभव

६) प्रथम निवडणुक आपण केव्हा लढविलीत ?

७) राजकारणामध्ये प्रवेश करावा असे केव्हा वाटले ?

८) विकास कामासाठी फंड्स अनुदान पुरेशी ठरतात काय ?

९) नसेल तर विकास कामासाठी लागणारा पैसा किंवा निधी कोठून उभारता ?

१०) शहराला भेडसावणाऱ्या ज्या समस्या आहेत त्या सोडविण्याबाबत तुम्ही किंवा तुमच्या पक्षाने कोणकोणती कार्ये केलीत ?

११) राजकारणात प्रवेश पूर्ण तयारीनिशी केलात की राजकारण प्रवेश अपघाताने झाला ?

१२) राजकारणात प्रवेश करण्याअगोदर एखाद्या बिगर राजकीय संस्था, सामाजिक संस्था अगर संघटनेमध्ये काम केले आहे का ? अध्यक्षपद भुषवले आहे का ? असेल तर कोणत्या ?

१३) राजकारणात अनेक लोकांशी भेटताना काही अडचणी जाणवतात का ? कोणत्या प्रकारे ?

१४) राजकारणामध्ये प्रवेश करण्याअगोदरचे आपले जीवन ,दिनचर्या व राजकारणात प्रवेश केल्यानंतरची दिनचर्या यामध्ये काही फरक सांगता येईल का ?

१५) राजकारणात आपणास घरच्यांचा पाठिंबा मिळतो का ? मिळत नसेल तर कोणत्या अडचणींचा सामना करावा लागतो ?

१६) राजकारणातील सहभागासाठी शैक्षणिक पात्रता गरजेची वाटते का ?

१७) आपण आपल्या मतदार संघात स्त्रियांसाठी काही कार्य केले आहे का ?

१८) नगरसेवक म्हणून स्वतःच्या इच्छेने निवडणुक लढविलीत की घरचा वारसा पुढे चालविण्यासाठी ?

१९) आपल्या अगोदर आपल्या घरातील किंवा नातेसंबंधातील दुसऱ्या कोणी निवडणुक लढविली होती का ?

२०) आजही आपल्या घरातील दुसरी कोणी व्यक्ती राजकारणामध्ये सक्रिय आहेत का ?

२१) पक्षाचे तिकीट मिळविण्यासाठी कोणी प्रयत्न केले?

२२) निवडणुकीची मोहिम स्वतः साभाळलीत की पाठीमागे राहून फक्त मार्गदर्शन केलेत यासाठी तुम्हाला दुसऱ्या कुणावर अवलंबून रहावे लागले का ?

२३) पुरुष नगरसेवकांना एक पुरुष म्हणून काम करताना कोणते फायदे मिळतात किंवा तोटे होतात. ?

२४) महानगरपालिकेतील विविध महत्वाच्या समित्यांवर कितपत संधी दिली जाते त्यातही जास्त संधी राजकीय वारसा चालविणाऱ्या स्त्रियांना मिळते व मुळातच पक्ष कार्यकर्त्या असलेल्या स्त्रियांना कमी संधी मिळते असा समज आहे याबद्दल आपले मत का ?

२५) सध्या नगरसेवक म्हणून निवडुण आल्यामुळे भविष्यात अनेक संधी मिळु शकतील असे वाटते का? कोणत्या?

## स्त्रियांसाठीचे प्रश्न

१) पहिल्यांदा राजकारणात उतरण्याचा जो निर्णय घेतला त्या घरात काय प्रतिक्रिया मिळाली?

२) स्त्री म्हणून निवडणूकीचे तिकीट मिळवताना पुरुषांच्या तुलनेने जास्त कठीण गेले की सोपे ?

३) निवडणुक प्रचारा दरम्यान तुम्ही स्त्री असुनही निवडणुकीस उभ्या राहता म्हणुन लोकांकडून कशा प्रकारच्या प्रतिक्रिया मिळाल्या?

४) नगरसेविका म्हणून करावयाची कामे व एका गृहिणीची कामे हा समतोल तुम्ही कसा सांभाळता ?

५) आज प्रर्यतच्या अनुभवावरुन स्त्री नगरसेविकांची कामे त्यांचे पतीच पाहतात या बद्दल आपले मत काय?

६) खुल्या प्रवर्गातून निवडुन आलात की आरक्षित जागातुन ?

७) राखीव मतदारसंघ मिळाला नसता तर निवडणुक लढविली असती का ?

८) पुढे राखीव मतदारसंघ रद्द झाला तरी या मतदारसंघातुन खुल्या प्रवर्गातुन निवडणुक लढविणार आहात का ?

९) एक स्त्री म्हणून नगरपालिकेतील कामे करताना पुरुषांच्या तुलनेत जास्त सहकार्य मिळाले की अडचणी आल्या ?

१०) एक स्त्री म्हणून महानगरपालिकेतील कामांना पूर्ण वेळ देऊ शकता का ?

११) निवडणूक लढविण्याची इच्छा होती पण अजुन संधी मिळाली नव्हती , मतदारसंघ राखीव मिळाल्या मुळे ती संधी मिळाली असे वाटते का ?

| विधान | मान्य | अमान्य |
|---|---|---|
| सर्वसाधारणपणे घरामध्ये, समाजामध्ये, राजकारणात अथवा इतर क्षेत्रामध्येहीपुरुषांच्या मानाने स्त्रियांना कमी लेखले जाते | | |
| सर्वसाधारणपणे चूल व मूल इथेपर्यंतच स्त्रियांचे कार्यक्षेत्र मर्यादित असावे | | |
| राजकारणात सक्रिय असलेल्या स्त्रीचे आपल्या संसाराकडे किंवा मुलांकडे दुर्लक्ष होते. | | |
| आज सर्वच क्षेत्रात स्त्रिया आघाडीवर असल्यामुळे त्यांच्याहितासाठी वेगळे प्रयत्न करण्याची गरज नाही. | | |
| राजकीय पक्षांमध्ये पुरुष सहका-यांच्या तुलनेमध्ये सर्वसाधारण महिला पक्ष कार्यकर्त्या बाजूला पडतात. | | |
| एक व्यक्ती म्हणून करिअर करणे ही स्त्रीची गरज आहे. | | |
| एक व्यक्ती म्हणून करिअर करणे ही स्त्रीची गरज आहे. | | |
| कुटुंबाचे विरोधात जाऊन एखाद्या स्त्रीने राजकारणात प्रवेश केला तर ते तिला जास्त कठीण जाते. | | |
| सर्वसाधारणपणे मतदार संघ राखीव पडला तर अगोदर निवडून आलेल्या उमेदवाराची पत्नी किंवा घरातील तत्सम व्यक्तींनाच जास्त संधी मिळते. | | |
| मुळातच पक्ष कार्यकर्ती असलेली स्त्री व राजकीय बाहुली स्त्री यांचे परस्परांशी फारसे सख्य नसते. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | महिला उमेदवारांनी फक्त महिलांच्यासाठी राखीव मतदार संघातूनच निवडणूक लढवावी. | | |
| १२ | पुरुष नगरसेवकांच्या तुलनेत स्त्री नगरसेवक आपला पुरेसा वेळ नगरसेवक म्हणून काम करताना देऊ शकत नाही. | | |
| १४ | एखादा धाडसी निर्णय घेताना स्त्री नगरसेवक पुरुष नगरसेवकांपेक्षा कमी पडतात | | |

320
PAT
T15547